THE

Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 2ND JULY 1896.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

**मेमन जमातीच्या लोकांना, आपण मुसलमानी कायद्यास पात्र आहों, असा इकरार करण्याची मोकळीक मिळेल असें करण्यासाठीं आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थीं मुंबई इलाक्यांत व इतर ठिकाणीं एका वर्गाचे लोक असून ते मेमन या नांवानें प्रसिद्ध आहेत, व त्या लोकांना कांहीं नियमित बाबतींत कोणता कायदा लागू आहे या गोष्टीबावद वेळोवेळीं प्रश्न उपस्थित झाले आहेत;

आणि ज्या अर्थीं त्यांपैकीं कांहीं लोक, हनफी मताप्रमाणें जो मुसलमानी कायदा ठरलेला आहे तो कायदा त्या बाबतींत आपणांस लागू आहे असें समजतात किंवा लागू असावा अशी इच्छा करितात;

आणि ज्या अर्थीं अशा लोकांस त्या बाबतींत तो कायदा लागू होण्याच्या संबधानें कांहीं तकरार राहणार नाहीं असें करण्यासाठीं काम चालविण्याची रीति ठरविणें योग्य आहे;

त्या अर्थी यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहेः—

१. (१) या आक्टास सन १८९६ चा मेमनांचा आक्ट असें ह्मणावें; आणि — सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. (१) वयांत आलेला आहे अशा कोणत्याहि मेमनानें, हनफी मताप्रमाणें ठरलेला मुसलमानी कायदा आपणास लागू असावा अशी आपली इच्छा आहे असा, यांत लगत खालीं सांगितलेल्या रीतीनें, इकरार केला ह्मणजे मग, उलट कसाहि रिवाज असला तथापि, ब्रिटिश हिंदुस्थानाच्या प्रत्येक भागांत तो कायदा इतर मुसलमानांस व त्यांच्या मालमिळकतीस, ज्या बाबतींमध्यें व जेथवर लागू असेल, त्या बाबतींमध्यें व तेथवर तो ब्रिटिश हिंदुस्थानाच्या त्याच भागांत त्यास, व अशा इकराराच्या वेळीं अल्पवयस्क असलेलीं किंवा त्या इकराराच्या नंतर जन्मलेलीं अशीं त्याचीं मुलें (कांहीं असल्यास) त्यांस, आणि जी मालमिळकत मिळण्याचा पूर्ण हक्क त्याला किंवा त्यांना त्या वेळीं असेल किंवा त्यानंतर प्राप्त होईल त्या सगळ्या मालमिळकतीस लागू होईल असें समजावें. — मेमनांनीं इकरार केल्यावर त्यांना मुसलमानी कायदा लागू होणें.

(२) वर सांगितल्याप्रमाणें केलेला कोणताहि इकरार मागें घेण्याजोगा असेल असें समजूं नये.

इकाराचा नमुना.

३. इकरार २ ऱ्या कलमाअन्वयें अमलांत यावा म्हणून, तो परिशिष्टांत नमूद केले-ल्या नमुन्याप्रमाणें किंवा त्यासारख्या नमुन्याप्रमाणें एक लेखी दस्तऐवज करून केला पाहिजे, आणि त्यावर इकरार करणारानें सही केली पाहिजे, आणि तो,—

(अ) सन १८७७ चा हिंदुस्थानचा नोंदण्याचा आक्ट त्या त्या काळीं जेथें अमलांत असेल तशा ब्रिटिश हिंदुस्थानाच्या कोणत्याहि भागांत करण्यांत आल्यास, इकरार करणाराच्या हयातींत त्या आक्टाअन्वयें नोंदला पाहिजे; आणि,

(ब) इतर ठिकाणीं करण्यांत आल्यास, नोटरी पब्लिकच्या पुढें, किंवा एखाद्या कोर्टाच्या, जज्जाच्या, माजिस्ट्रेटाच्या, ब्रिटिश कान्सलाच्या अगर व्हैस-कान्सलाच्या पुढें, किंवा मलिका मआज्झमांच्या अगर हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधीच्या पुढें लिहून दिला पाहिजे, आणि त्याच्या खरेपणाबद्दल त्यावर त्या नोटरी पब्लिकानें किंवा त्या कोर्टानें, जज्जानें, माजिस्ट्रेटानें, कान्सलानें अगर व्हैस-कान्सलानें, किंवा त्या प्रतिनिधीनें सही केली पाहिजे.

मेमनांच्या लागोपाठ दोन पिढ्यांतील इसमांनीं केलेले इकरार पुढील पिढ्यांतील इसमांस बद्धक होणें.

४. सदरील ठरावांअन्वयेंचे इकरार एकाद्या मेमनानें व त्याच्या मुलांपैकीं कोणत्याहि एका मुलानें केले म्हणजे मग, हनफी मताप्रमाणें जो मुसलमानी कायदा ठरलेला आहे तो कायदा, उलट कसाहि रिवाज असला तथापि, अशा मुलाच्या परंपरागत सर्व वंशजांस, ब्रिटिश हिंदुस्थानाच्या त्याच भागांतील इतर मुसलमानांना तो ज्या रीतीनें व जेथवर लागू असेल त्याच रीतीनें व तेथवर, लागू होईल असें समजावें.

कायम ठेवणें.

५. या आक्टांतील कोणत्याहि ठरावावरून—

(१) कोणत्याहि मनुष्याला कोणत्याहि प्रकारच्या मुसलमानी कायद्यास या आक्टांत ठरविलेल्या रीतीखेरीज इतर कोणत्याहि रीतीनें पात्र असण्याची किंवा होण्याची मनाई आहे असा, किंवा

(२) कलमें २ व ४ यांत ज्यांचा उल्लेख केला आहे तशीं मुलें व परंपरागत वंशज हीं खेरीज करून, इकरार करणाराच्या कुटुंबांतील इतर कोणत्याहि इसमाच्या हक्कांस बाध येतो असा,

त्या ठरावाचा अर्थ करूं नये.

## परिशिष्ट.

### इकराराचा नमुना.

मी, अ. ब. वलद क. ड., मेमन असून व माझें वय वर्षांहून कमी नसून, मी यावरून असा इकरार करतों कीं हनफी मताप्रमाणें ठरलेला मुसलमानी कायदा, सन १८९६ च्या मेमनांच्या आक्टावरून ठरविलें आहे तेथवर, मला लागू असावा अशी माझी इच्छा आहे.

माझ्या सहीनिशीं दिला असे, आज तारीख माहे सन १८ .

अ. ब.

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

मेमन या नांवानें प्रसिद्ध असलेल्या जमातीचे जे लोक आहेत ते मूळचे हिंदु असून त्यांच्या पूर्वजांनीं मुसलमानी धर्म स्वीकारला; परंतु, त्यांना आतां साधारणतः मुसलमान ह्मणून मानण्यांत येतें तथापि, त्यांच्या पैकीं कित्येक लोकांचें कांहीं बाबतींत मुसलमानी कायद्याच्या ऐवजीं हिंदु रूढीनें अद्यापि नियमन करण्यांत येतें असें कोर्टांनीं ठरविलें आहे. ही स्थिती समाधानकारक नाहीं व हनफी मताचा मुसलमानी कायदा मेमन जमातीच्या लोकांना लागू आहे असें, कायदा करून, ठरवावें असें एकाहून अधिक प्रसंगीं हिंदुस्थान

सरकारास दर्शविण्यांत आलें आहे. सदर्हूप्रमाणें ठरवावें अशी मेमन जमातीच्या एकंदर लोकांची इच्छा आहे असें दाखविण्यांत आल्याशिवाय तसें करणें रास्त होईल असें हिंदुस्थान सरकारास वाटत नाहीं, व या विषयाच्या संबंधानें त्या जमातीच्या सर्व लोकांचें एकमत आहे अशी त्या सरकारची खात्री झालेली नाहीं. तथापि ज्या ज्या कोणत्याही मेमनांची तशी इच्छा असेल त्यांना, साधारण मुसलमानांप्रमाणेंच मुसलमानी कायदा आपणास, इकरार करून देऊन, लागू करून घेण्याची, व तेणेंकरून, जी रूढी त्यांना मान्य नाहीं तीच रुढी त्यांस लागू आहे असा ठराव होण्याची जोखीम टाळण्याची, सवड देणें अगदी रास्त असून त्याप्रमाणें करण्यास कोणतीच हरकत नाहीं असें दिसतें. या हेतूनें सन १८८९ सालीं आक्टाचा मसुदा तयार केला होता व तो कौन्सिलाच्या पुढें प्रत्यक्ष आणलाहि होता; परंतु इकरार करण्याचा बोजा मतांतर स्थापकांवर, ह्मणजे, मुसलमानी कायद्यानें आपलें नियमन व्हावें अशी ज्या मेमन लोकांची इच्छा होती त्यांजवर ठेवावा, किंवा जुन्या मताच्या पक्षावर, ह्मणजे, आपल्या मूळच्या पूर्वजांप्रमाणें आपणांसाहि हिंदु मानावें ही गोष्ट ज्यांस ज्यास्त पसंत होती त्या मेमन लोकांवर ठेवावा याबाबद मतभेद पडला, व त्यामुळें त्या मसुद्याच्या संबंधानें पुढें विचार करण्यांत आला नाहीं. सदर्हू विषयावर दुसरा एक अर्ज मुंबई सरकारच्या मार्फत सादर करण्यांत आल्यावरून सदर्हू सूचनेचें थोडक्याच दिवसांवर पुनरुज्जीवन करण्यांत आलें असून, सदर्हू सन १८८९ चा मसुदा, चार प्रकारच्या फेरफारांनिशीं, पुनः कौन्सिलापुढें आणण्याची योजना केली आहे. सदर्हू फेरफारांवरून असें ठरविलें आहे कीं (१) जो इकरार बापाकडून करण्यांत येईल तो, अशा इकराराच्या वेळीं अल्पवयस्क असतील अशीं किंवा त्या इकराराच्या नंतर जन्मलीं असतील अशीं त्याचीं मुलें कांहीं असल्यास त्यांस बद्धक होईल, (२) एक वेळ इकरार केला ह्मणजे मग तो मागें घेतां येणार नाहीं, (३) बापानें जसा इकरार केला असेल तसाच इकरार त्याच्या मुलानेंहि केला ह्मणजे मग त्या मुलाचे परंपरागत सर्व वंशज तेणेंकरून बांधले जातील, आणि (४) योजलेल्या कायद्यांतील कोणत्याही ठरावावरून, वर सांगितलीं आहेत तशीं मुलें व परंपरागत वंशज हीं खेरीजकरून, इकरार करणाराच्या कुटुंबांतील इतर कोणत्याहि इसमाच्या हक्कांस बाध येणार नाहीं.

तारीख १९ माहे मार्च, सन १८९६.

(सही) जे. वुडबर्न.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 2ND JULY 1896.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

## सन १८९६ चा मसुदा नंबर १४.

### सन्मार्गप्रवर्तक शाळांबाबदच्या आक्टाचा मसुदा.

अनुक्रमणिका.

कलमें.

१—प्रथमारंभींचे ठराव.

१. सरनामा, व्याप्ति व सुरवात.

२. सन १८७६ चा ५ वा आक्ट रद्द करणें.

३. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचें ३९९ वें कलम, कलम १, पोटकलम (३), याअन्वयें जाहिरनामा काढला ह्मणजे रद्द होईल.

४. व्याख्या.

२.—सन्मार्गप्रवर्तक शाळा.

५. सन्मार्गप्रवर्तक शाळा स्थापण्याचा व बंद करण्याचा अधिकार.

६. शाळांकरितां जरूर असणाऱ्या गोष्टी.

७. सन्मार्गप्रवर्तक शाळांची पाहणी.

८. अल्पवयी अपराध्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें पाठविण्याविषयीं हुकूम करण्याचा कोर्टांचा अधिकार.

९. ८ व्या कलमाअन्वयें हुकूम करण्याचा माजिस्ट्रेटास अधिकार नसेल तेव्हां काम चालविण्याची रीत.

१०. कैदेची शिक्षा दिलेल्या सोळा वर्षांखालील मुलग्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें पाठविण्याविषयीं फर्मोविण्याचा माजिस्ट्रेटांचा अधिकार.

"माजिस्ट्रेट" याची व्याख्या.

कलमें.

११. अल्पवयी अपराध्याच्या वयाबाबद पूर्वचौकशी व ठराव.

१२. अशा अपराध्यांस कोणत्या सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठवावयाचें तें सरकारानें ठरविणें.

१३. अल्पवयी अपराध्यांखेरीज इतर मनुष्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकवून न ठेवणें.

१४. सरकारच्या हुकुमानें सोडून देणें किंवा दुसऱ्या जागीं नेणें.

१५. ८ व्या, ९ व्या किंवा १० व्या कलमाखालील हुकूम अपिलास किंवा तपासणीस पात्र नाहींत.

१६. चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण दिलें नसतां कैदेस पात्र असणाऱ्या सोळा वर्षांच्या वयाखालील मुलग्याच्या बाबतींत आक्टाचे ठराव लागू होणें.

३. सन्मार्गप्रवर्तक शाळांची व्यवस्था.

१७. सुपरिंटेंडंट व व्हिजिटरांची कमिटी यांची किंवा बोर्ड आफ् म्यानेजमेंटची नेमणूक.

कलमें.

१८. सुपरिंटेंडंटाका मजूर चाकरीस ठेवणाराकडे अल्पवयी अपराध्यांस परवान्यानें देतां येईल.

१९. परवाना रद्द करणें.
चाकरीस ठेवणाराची फिर्याद रास्त असल्यास बारा महिनेपर्यंत नवीन परवाना न देणें.

२० परवाना संपणें.

२१. वाईट रीतीनें वागविल्याचे प्रसंगीं परवाना रद्द करणें.

२२. सुपरिंटेंडंट अल्पवयी अपराध्यांचा पालन करणारा आहे असें समजणें.
अल्पवयी अपराध्यास अप्रेन्टीस करण्याचा अधिकार.

२३. व्हिजिटरांच्या कमिटीचीं कामें.

२४. बोर्ड आफ् म्यानेजमेंट याचे अधिकार.

२५. शाळेच्या ट्रस्टींस किंवा इतर व्यवस्थापकांस बोर्ड आफ् म्यानेजमेंटमध्यें नेमण्याचा अधिकार.

२६. बोर्डाचा कानू करण्याचा अधिकार.

कलमें.

४.—सन्मार्गप्रवर्तक शाळांच्या संबंधानें अपराध.

२७. मना केलेले जिन्नस शाळेंत आणण्याबद्दल किंवा तींतून काढण्याबद्दल किंवा देण्याबद्दल शिक्षा.

२८. अल्पवयी अपराध्यांस पळून जाण्यामध्यें साह्य करण्याबद्दल शिक्षा.

२९. पळून गेलेल्या अल्पवयी अपराध्यांस धरणें.

५.—किरकोळ.

३०. सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकावून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांस सन १८६९ चा १९ वा आक्ट लागू करणें.

३१. अल्पवयी अपराध्यांची इतर रीतीनें कशी व्यवस्था करतां येईल.

३२. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या ३९७ व्या कलमाची सुधारणा.

---

## सन्मार्गप्रवर्तक शाळांसंबंधी कायदा सुधारणें व अल्पवयी अपराध्यांच्या व्यवस्थेसाठीं जादा ठराव करणें यांविषयींच्या आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी सन्मार्गप्रवर्तक शाळांसंबंधी कायदा सुधारणें व अल्पवयी अपराध्यांच्या व्यवस्थेसाठीं जादा ठराव करणें योग्य आहे, त्या अर्थी यावरून खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

### १.—प्रथमारंभींचे ठराव.

सरनामा, व्याप्ति व सुरवात.

१. (१) या आक्टास सन १८९६ चा सन्मार्गप्रवर्तक शाळांचा आक्ट असें म्हणावें.

(२) तो सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू आहे; आणि

(३) तो ब्रिटिश हिंदुस्थानच्या ज्या ज्या प्रांतांत सन १८७६ चा सन्मार्गप्रवर्तक शाळांचा आक्ट हल्लीं अमलांत आहे अशा दरेक प्रांतांत एकदम आणि दुसऱ्या दरेक प्रांतांत स्थानिक सरकार स्थानिक सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन या बाबतींत फर्मावील त्या त्या तारखेस अमलांत येईल.

सन १८७६ चा ५ वा आक्ट रद्द करणें.

२. (१) सन १८७६ चा सन्मार्गप्रवर्तक शाळांचा आक्ट यावरून रद्द केला आहे.

(२) परंतु सदरहू आक्टाअन्वयें चालविलेलीं सर्व कामें, काढलेले सर्व हुकूम, नेमलेले किंवा अधिकार दिलेले सर्व अमलदार व केलेले सर्व कानू, अनुक्रमें, या आक्टाअन्वयें चालविलीं आहेत, काढले आहेत, नेमलेले किंवा अधिकार दिलेले आहेत व केलेले आहेत असें, शक्य असेल तेथवर, मानलें पाहिजे.

(३) कोणत्याही कायद्यांत किंवा दस्तऐवजांत सदरहू आक्टावर हवाला दिला असेल तो, शक्य असेल तेथवर, या आक्टावर किंवा त्याच्या जुळत्या भागावर दिला आहे असें समजलें पाहिजे.

सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचें ३९९ वें कलम, कलम १, पोटकलम (३), या

३. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याचें ३९९ वें कलम यावरून रद्द केलेलें असून, हा ठराव, ब्रिटिश हिंदुस्थानच्या ज्या कोणत्याही प्रांतांत हल्लीं तें अमलांत असेल त्या प्रांताच्या संबंधानें कलम १, पोट कलम (३),

याअन्वयें त्या प्रांतांत हा आक्ट अमलांत आणण्याविषयीं जाहिरनामा निघाल्याच्या तारखेपासून अमलांत येईल. अन्वयें जाहिरनामा काढला ह्मणजे रद्द होईल.

४. या आक्टांत, विषयास किंवा संदर्भास कोणताही बाध येत नसेल तर,— व्याख्या.

(अ) "अल्पवयी अपराधी" याचा अर्थ, ज्या कोणत्याही मुलग्यावर कैदेची किंवा काळ्या पाण्यावर पाठविण्याची शिक्षा होण्याजोग्या कोणत्याही अपराधाची शाबिती झाली असून ज्याचें वय अशी शाबिती झाल्यावेळीं सोळा वर्षांच्या आंत असेल तो मुलगा, असा आहे; आणि

(ब) "इन्स्पेक्टर जनरल" यांत, तुरुंगांच्या इन्स्पेक्टर जनरलकडे या आक्टांत सोंपलेल्या कामांपैकीं सर्व किंवा कोणतींही कामें करण्यासाठीं स्थानिक सरकारानें नेमलेल्या कोणत्याही अमलदाराचा समावेश होतो.

## २.—सन्मार्गप्रवर्तक शाळा.

५. गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजुरी घेऊन स्थानिक सरकारास— सन्मार्गप्रवर्तक शाळा स्थापण्याचा व बंद करण्याचा अधिकार.

(अ) त्यास योग्य वाटतील तशा जागीं सन्मार्गप्रवर्तक शाळा स्थापतां येतील;

(ब) स्थानिक सरकार त्याबाबद या आक्टास अनुसरून असणारे कानू ठरवील त्यांप्रमाणें वागण्यास राजी असणाऱ्या मनुष्यांनीं चालवलेल्या शाळांचा सन्मार्गप्रवर्तक शाळांप्रमाणें उपयोग करतां येईल;

(क) सदरहूप्रमाणें स्थापलेली किंवा उपयोग केलेली कोणतीही शाळा सन्मार्गप्रवर्तक शाळेप्रमाणें असण्याची बंद व्हावी किंवा तिचा तसा उपयोग करण्याचें बंद करावें असें फर्मावितां येईल.

६. सदरहूप्रमाणें स्थापलेल्या किंवा उपयोग केलेल्या दरेक शाळेंत— शाळांकरितां जरूर असणाऱ्या गोष्टी.

(अ) तेथें राहणारांस रात्रीं निरनिराळें ठेवण्याचें पुरतें साधन;

(ब) तींत अटकवून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांकरितां योग्यरीतीची आरोग्यरक्षणासंबंधी व्यवस्था, पाण्याचा पुरवठा, अन्न, वस्त्रें व अंथरूण पांघरूण;

(क) अशा अल्पवयी अपराध्यांस उद्योगसंबंधी शिक्षण देण्याचें साधन;

(ड) असे अल्पवयी अपराधी आजारी असतील तेव्हां त्यांस ठेवण्याकरितां इन्फर्मरी [बीमारखाना] किंवा योग्य जागा;

हीं असलीं पाहिजेत.

७. (१) जी शाळा सन्मार्गप्रवर्तक शाळा ह्मणून स्थापण्याचा किंवा तिचा तसा उपयोग करण्याचा इरादा असेल अशा दरेक शाळेची पहाणी, तिचा त्याप्रमाणें उपयोग करण्यापूर्वी इन्स्पेक्टर-जनरलानें केली पाहिजे आणि ६ व्या कलमावरून जरूर असल्याप्रमाणें व्यवस्था केलेली आहे व अशा शाळेंत या आक्टाअन्वयें पाठविण्यांत येतील त्या अल्पवयी अपराध्यांस ठेवण्याकरितां ती त्याच्या मतें योग्य आहे असें त्यास आढळेल, तर त्यानें त्याप्रमाणें दाखला दिला पाहिजे, आणि असा दाखला व ती शाळा सन्मार्गप्रवर्तक शाळा ह्मणून स्थापण्याविषयींचा किंवा तिचा त्याप्रमाणें उपयोग करावा असें फर्माविण्याविषयींचा स्थानिक सरकारचा हुकूम, हे, स्थानिक सन्मार्गप्रवर्तक शाळांची पाहणी.

सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध केले पाहिजेत, व त्यानंतर ती शाळा सन्मार्गप्रवर्तक शाळा आहे असें मानलें पाहिजे.

(२) अशी दरेक शाळा सदरहू इन्स्पेक्टर-जनरलानें वेळोवेळीं, दरसाल निदान एकदा तरी जाऊन पाहिली पाहिजे, व त्यानें स्थानिक सरकारास, तें स्थानिक सरकार ठरवील तशा नमुन्याप्रमाणें, त्या शाळेच्या स्थितीविषयीं रिपोर्ट पाठविला पाहिजे.

अल्पवयी अपराध्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें पाठविण्याविषयीं हुकूम करण्याचा कोर्टाचा अधिकार.

८. (१) कोणत्याही अल्पवयी अपराध्यास काळ्यापाण्यावर पाठविण्याची किंवा कैदेची शिक्षा दिली असेल, व ज्या कोर्टानें त्यास शिक्षा दिली त्याच्या मतें तो सन्मार्गप्रवर्तक शाळेंत ठेवण्यासारखा मनुष्य असेल, तेव्हां त्या कोर्टाला, त्यानें आपली शिक्षा भोगण्याच्या बदला त्यास अशा शाळेंत पाठवावें असें व तेथें जी मुदत,—

(अ) कोणत्याही बाबतींत दोन वर्षांहून कमी नाहीं किंवा सात वर्षांहून जास्त नाहीं इतक्या;

(ब) अपराध्यावर अपराधाची शाबिती झाल्याच्या तारखेस त्याचें वय दहा वर्षांच्या आंत असेल तर सात वर्षांच्या;

(क) त्याचें वय त्यावेळीं दहा वर्षांचें झालेलें असेल तर, त्याचें वय पांच वर्षांच्या आंत अठरा वर्षांचें होईल असें कोर्टाचें मत नसल्यास, पांच वर्षांहून कमी नाहीं इतक्या; आणि

(ड) अशा शेवटीं सांगितलेल्या बाबतींत त्याचें वय अठरा वर्षांचें होई तोंपर्यंतच्या,

मुदतीपर्यंत अटकावून ठेवावा असें फर्मावितां येईल.

(२) या कलमांत सदरीलप्रमाणें कोर्टास दिलेले अधिकार फक्त (अ) हाय कोर्टानें, (ब) सेशन कोर्टानें, (क) जिल्हा किंवा पोट-तुकडी माजिस्ट्रेटानें, (ड) या बाबतींत स्थानिक सरकारानें मुद्दाम अधिकार दिलेल्या पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटानें आणि (ई) कलकत्ता, मद्रास व मुंबई या शहरांमध्यें प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटानें चालविले पाहिजेत.

८ व्या कलमाअन्वयें हुकूम करण्याचा माजिस्ट्रेटास अधिकार नसेल तेव्हां काम चालविण्याची रीत.

९. (१) गेल्या शेवटच्या कलमाअन्वयें हुकूम करण्याचा अधिकार नसणाऱ्या कोणत्याही माजिस्ट्रेटानें कोणा अल्पवयी अपराध्यास कैदेची शिक्षा दिली असून तो अपराधी सन्मार्गप्रवर्तक शाळेंत ठेवण्यासारखा मनुष्य आहे असें त्याचें मत असेल, तेव्हां त्याला असें मत लेखी नमूद करून, ज्या जिल्हा किंवा पोटतुकडी माजिस्ट्रेटाचा ताबेदार तो असेल त्याकडे आपण चालविलेलें काम सादर करतां व त्या अल्पवयी अपराध्यास रवाना करतां येईल.

(२) ज्या माजिस्ट्रेटाकडे याप्रमाणें काम सादर केलें असेल त्याला कांहीं जास्त चौकशी करणें योग्य वाटल्यास त्यास ती करतां येईल, आणि अशा अल्पवयी अपराध्याचा अवल इनसाफ त्याकडून होऊन शिक्षा झाली असती तर त्यानें त्या अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकावून ठेवण्याबद्दल किंवा इतर रीतीनें हुकूम केला असता तसा हुकूम करतां येईल.

कैदेची शिक्षा दिलेल्या सोळा वर्षांखालील मुलांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें पाठविण्याविषयीं फर्माविण्याचा माजिस्ट्रेटांचा अधिकार.

१०. (१) सोळा वर्षांच्या वयाखालील कोणत्याही अल्पवयी अपराध्यास कैदेची शिक्षा दिली असेल किंवा देण्यांत येईल तेव्हां, ज्या तुरुंगांत अशा अल्पवयी अपराध्यास अटकेंत ठेविलें असेल तो तुरुंग स्वाधीन असणाऱ्या अमलदारास, असा तुरुंग ज्या जिल्हा किंवा पोट-तुकडी माजिस्ट्रेटाच्या अधिकारांत असेल त्यापुढें त्याला आणतां येईल; आणि अशा माजिस्ट्रेटाला, असा अल्पवयी अपराधी सन्मार्गप्रवर्तक शाळेंत ठेवण्यासारखा मनुष्य आहे असें दिसल्यास, त्याला सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविण्याविषयीं आणि कलम ८, पोटकलम (१), यांत ठरविलेल्या अटकावाच्या मुदतीसंबंधीं त्यांत

ज्या इयत्ता सांगितल्या आहेत त्याच इयत्तांस पात्र असणाऱ्या अशा मुदतीपर्यंत तेथें अटकवून ठेवण्याविषयीं फर्मावतां येईल.

"माजिस्ट्रेट" याची व्याख्या.

(२) कलकत्ता, मद्रास व मुंबई या शहरांमध्यें, प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेट हा, या कलमाच्या कारणासाठीं ज्याच्या अधिकारांत सदरहू तुरुंग आहे असा जिल्हा किंवा पोट-तुकडी माजिस्ट्रेट आहे असें मानलें पाहिजे.

अल्पवयी अपराध्याच्या वयाबाबद पूर्वचौकशी व ठराव.

११. (१) कोणत्याही अल्पवयी अपराध्यास कलम ८, कलम ९ किंवा कलम १० याअन्वयें सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविण्याविषयीं फर्माविण्यापूर्वी कोर्टानें किंवा माजिस्ट्रेटानें त्याच्या वयाप्रकरणीं चौकशी केली पाहिजे आणि कांहीं पुरावा घेणें जरूर वाटल्यास तो घेऊन, त्याविषयीं आपला ठराव लिहून ठेविला पाहिजे.

(२) कलम ८ किंवा कलम १० याअन्वयें हुकुम करतेवेळीं कोर्टानें, अल्पवयी अपराध्यास ज्या मुदतीपर्यंत अटकवून ठेवावयाचें, ती ठरवितांना, या कलमाचें पोटकलम (१) याअन्वयें त्याच्या वयाबाबद लिहून ठेविलेल्या ठरावाकडे लक्ष पुरविलें पाहिजे, आणि त्याप्रमाणें असा हुकुम केला पाहिजे.

अशा अपराध्यांस कोणत्या सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठवावयाचें तें सरकारानें ठरविणें.

१२. ज्यास कोर्टानें किंवा माजिस्ट्रेटानें सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविण्याविषयीं फर्माविलें असेल अशा दरेक अल्पवयी अपराध्यास, अशा कोर्टानें किंवा माजिस्ट्रेटानें याप्रमाणें व्यवस्था लावलेल्या अल्पवयी अपराध्यांस घेण्याकरितां जी सन्मार्गप्रवर्तक शाळा स्थानिक सरकार नेमील तिजमध्यें पाठविलें पाहिजे.

मात्र असें ठरविण्यांत येतें कीं, अशा अल्पवयी अपराध्याची सन्मार्गप्रवर्तक शाळेंत ताबडतोब सोई होण्यासारखी नसेल, तर त्याला सन्मार्गप्रवर्तक शाळेंत नेण्यांत येई तोंपर्यंत एकाद्या तुरुंगाच्या जुव्हेनाइल वार्डमध्यें किंवा स्थानिक सरकार फर्मावील तशा इतर योग्य भागामध्यें अटकेंत ठेवतां येईल, आणि याप्रमाणें भोगलेल्या कैदेची मुदत सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्यादाखल मानली पाहिजे.

अल्पवयी अपराध्यांखेरीज इतर मनुष्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकवून न ठेवणें.

१३. कोणा मनुष्याचें वय अठरा वर्षांच्या वर आहे असें कळल्यानंतर त्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याचा अधिकार कलम ८, कलम १० किंवा कलम १२ यांतील कोणत्याही मजकुरावरून मिळतो असें समजूं नये.

सरकारच्या हुकुमानें सोडून देणें किंवा दुसऱ्या जागीं नेणें.

१४. स्थानिक सरकाराला कोणत्याही अल्पवयी अपराध्याविषयीं खालीलप्रमाणें कोणत्याही वेळीं हुकुम करतां येईलः ह्मणजे—

(अ) त्याला सन्मार्गप्रवर्तक शाळेंतून सोडून देण्याविषयीं हुकुम करतां येईल;

(ब) त्याच्या अवल शिक्षेची मुदत संपण्यापूर्वी त्यास याप्रमाणें सोडून दिलें असलें तर अशा शिक्षेची मुदत भरे तोंपर्यंत किंवा त्याहून जी कमी मुदत स्थानिक सरकार फर्मावील त्या मुदतीपर्यंत स्थानिक सरकार नेमील तशा जागीं अटकेंत ठेवण्याविषयीं हुकुम करितां येईल; किंवा

(क) अशा सरकारच्या ताब्यांतील मुलुखांच्या आंत असणाऱ्या एका सन्मार्गप्रवर्तक शाळेंतून तशा दुसऱ्या शाळेंत नेण्याविषयीं, हुकुम करितां येईल; मात्र त्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याची एकंदर मुदत सदरीलप्रमाणें दुसऱ्या शाळेंत नेल्यामुळें वाढतां कामा नये.

८ व्या, ९ व्या किंवा १० व्या कलमाखालील हुकूम अपिलास किंवा तपासणीस पात्र नाहींत.

१५. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा यांतील कोणत्याही मजकुरावरून कोणत्याही कोर्टास किंवा माजिस्ट्रेटास अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याबद्दल कलम ८, कलम ९ किंवा कलम १०, याअन्वयें केलेल्या कोणत्याही हुकुमांत फेरफार करण्याचा किंवा तो रद्द करण्याचा अधिकार प्राप्त होतो असें समजूं नयेः मात्र असें ठरविण्यांत येतें कीं ज्या

कैदेच्या शिक्षेच्याबदला सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याविषयीं अशा कोणत्याही हुकुमावरून फर्माविलें असेल ती कैदेची शिक्षा अपिलांत किंवा तपासणींत रद्द होईल, तर अटकवून ठेवण्याबद्दलचा असा हुकुम लगेच निरर्थक होऊन त्याचा अमल चालण्याचें बंद होईल.

चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण दिलें नसतां कैदेस पात्र असणाऱ्या सोळा वर्षांच्या वयाखालील मुलग्याच्या बाबतींत आक्टाचे ठराव लागू होणें.

१६. जेव्हां सोळा वर्षांच्या वयाखालील कोणी मुलगा, त्यानें आपल्या चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण न दिल्यामुळें, सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतिविषयींचा कायदा याच्या १२३ व्या कलमाअन्वयें तुरुंगांत पाठविला जाण्यास पात्र असेल तेव्हां, तो कलम ४, रकम (अ), ह्याच्या अर्थाप्रमाणें अल्पवयी अपराधी असल्याप्रमाणें, त्यास या आक्टाचे ठराव लागू होतील.

### ३.—सन्मार्गप्रवर्तक शाळांची व्यवस्था.

सुपरिंटेंडंट व व्हिजिटरांची कमिटी यांची किंवा बोर्ड ऑफ् म्यानेजमेंटची नेमणूक.

१७. (१) दरेक सन्मार्गप्रवर्तक शाळेचा निर्बंध व व्यवस्था ठेवण्यासाठीं स्थानिक सरकारानें (अ) एक सुपरिंटेंडंट व व्हिजिटरांची कमिटी नेमली पाहिजे, किंवा (ब) बोर्ड ऑफ् म्यानेजमेंट*नेमला पाहिजे.

(२) याप्रमाणें नेमलेल्या दरेक कमिटींत व दरेक बोर्डांत निदान पांच मनुष्यें असलीं पाहिजेत व त्यांतून निदान दोन हिंदुस्थानचीं असलीं पाहिजेत.

(३) स्थानिक सरकाराला, सदरहूप्रमाणें नेमलेल्या कोणत्याही सुपरिंटेंडंटास किंवा कमिटीच्या किंवा बोर्डाच्या कोणत्याही सभासदास सस्पेंड किंवा कामावरून दूर करतां येईल.

सुपरिंटेंडंटाला मजूर चाकरीस ठेवणारांकडे अल्पवयी अपराध्यांस परवान्यानें देतां येईल.

१८. (१) सदरहूप्रमाणें नेमलेल्या दरेक सुपरिंटेंडंटाला, सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविलेल्या ज्या कोणत्याही अल्पवयी अपराध्याचें वय चवदा वर्षांचें झालें असेल त्यास, आपल्या सहीच्या परवान्यानें, अशा परवान्यांत नांव लिहिलेला जो कोणताही विश्वासू व प्रतिष्ठित मनुष्य, किंवा सरकारचा किंवा म्युनिसिपालिटीचा जो कोणताही अमलदार, मजूर चाकरीस ठेवणारा असून त्यास घेऊन त्याचा सांभाळ करण्यास राजी असेल त्याच्या ताब्यांत, त्यानें अशा अल्पवयी अपराध्यास कोणत्या तरी धंद्यांत, पेशांत किंवा उद्योगांत कामास लावलें पाहिजे अशा शर्तीनें, राहण्याची परवानगी देतां येईल.

(२) सदरील परवाना तीन महिन्यांपर्यंत अमलांत राहील, त्याहून ज्यास्त वेळ राहणार नाहीं, परंतु ज्या मुदतीपर्यंत अल्पवयी अपराध्यास अटकवून ठेवण्याविषयीं फर्माविलें असेल ती मुदत संपेपर्यंत तो कोणत्याही वेळीं व वेळोवेळीं एका वेळेस तीन महिन्यांबद्दल नवीन करून देतां येईल.

परवाना रद्द करणें.

चाकरीस ठेवणाराची फिर्याद रास्त असल्यास, बारा महिनेपर्यंत नवीन परवाना न देणें.

१९. सदरहू परवान्यांत नांव लिहिलेला चाकरीस ठेवणारा सांगेल तेव्हां तो परवाना रद्द केला पाहिजे; आणि तो परवाना जर त्या अल्पवयी अपराध्याकडून गैरवर्तणूक झाल्याबद्दल त्या चाकरीस ठेवणारानें कोणतीही फिर्याद केल्यामुळें रद्द करण्यांत आला असला, आणि त्या फिर्यादीस चांगला आधार असून तो परवाना याप्रमाणें रद्द करण्याला रास्त सबबी होत्या असें सुपरिंटेंडंटाचें मत असलें, तर, त्या परवान्याची मुदत संपल्यानंतर बारा महिन्यांपर्यंत त्याच अल्पवयी अपराध्याबद्दल दुसरा कोणताही परवाना देतां कामा नये.

परवाना संपणें.

२०. जर परवान्याच्या मुदतींत, त्यांत ज्या चाकरीस ठेवणाराचें नांव लिहिलें असेल तो मरण पावेल किंवा काम बंद करील, किंवा ज्या मुदतीपर्यंत अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याविषयीं फर्माविलें असेल ती मुदत संपेल, तर त्यावर तो परवाना बंद होईल व संपेल.

---

* बोर्ड ऑफ् म्यानेजमेंट=व्यवस्थापक मंडळी.

२१. चाकरीस ठेवणारानें अल्पवयी अपराध्यास वाईट रीतीनें वागविलें आहे, किंवा त्याच्या बिऱ्हाडाची व गुजाऱ्याची योग्य तजवीज केलेली नाहीं असें सुपरिंटेंडंटास दिसेल तर त्या सुपरिंटेंडंटाला परवाना रद्द करतां येईल.

वाईट रीतीनें वागविल्याचे प्रसंगीं परवाना रद्द करणें.

२२. (१) सन १८९० चा आक्ट १९ (अप्रेन्टिसांला बांधून घेण्याबाबदचा) याच्या अर्थाप्रमाणें सन्मार्गप्रवर्तक शाळेचा सुपरिंटेंडंट हा अशा शाळेंत अटकवून ठेवलेल्या दरेक अल्पवयी अपराध्याचा पालन करणारा आहे असें समजलें पाहिजे.

सुपरिंटेंडंट अल्पवयी अपराध्यांचा पालन करणारा आहे असें समजणें.

(२) १८ व्या कलमाअन्वयें परवाना दिलेला कोणताही अल्पवयी अपराधी आपल्या परवान्याच्या एका किंवा अधिक मुदतींत चांगल्या रीतीनें वागला असें सुपरिंटेंडंटास दिसेल तर त्या सुपरिंटेंडंटाला सदरहू आक्टाच्या ठरावांअन्वयें त्यास अप्रेन्टीस करतां येईल आणि याप्रमाणें तो अप्रेन्टीस झाल्यावर अशा अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याचा हक्क बंद होईल, आणि त्याच्या शिक्षेची कांहीं मुदत शिलक राहिली असल्यास ती रद्द केली पाहिजे.

अल्पवयी अपराध्यास अप्रेन्टीस करण्याचा अधिकार.

२३. (१) सन्मार्गप्रवर्तक शाळेकरितां १७ व्या कलमाअन्वयें नेमलेल्या व्हिजिटरांच्या दरेक कमिटीनें दरेक महिन्यांत निदान एकदा—

व्हिजिटरांच्या कमिटीचीं कामें.

(अ) गाऱ्हाणीं ऐकण्यासाठीं आणि ६ व्या कलमावरून जरूर असणाऱ्या गोष्टी केल्या असल्याबद्दल व शाळेची व्यवस्था सर्व प्रकारें योग्य असल्याबद्दल पाहण्यासाठीं शाळेंत गेलें पाहिजे;

(ब) शिक्षेचें बूक तपासलें पाहिजे;

(क) कोणतींही विशेष प्रकरणें असतील तीं इन्स्पेक्टर जनरलाच्या नजरेस आणलीं पाहिजेत; आणि

(ड) कोणत्याही मनुष्यास शाळेंत गैरकायदेशीर रीतीनें अटकवून ठेविलें नसल्याबद्दल पाहिलें पाहिजे.

(२) सदरहूप्रमाणें नेमलेल्या व्हिजिटरांच्या कमिटीच्या कोणत्याही सभासदाकडून शाळेंत जाण्याची व वर सांगितलेलीं कामें बजावण्यामध्यें साह्य करण्याची एकसारखी सहा महिनेपर्यंत चूक किंवा हयगई होईल, तर तो अशा कमिटीचा सभासद असण्याचा बंद होईल.

२४. जर १७ व्या कलमांत दिलेला अधिकार चालवून स्थानिक सरकार कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेसाठीं बोर्ड आफ् म्यानेजमेंट नेमील, तर १८ ते २२ या पांच कलमांअन्वयें सुपरिंटेंडंटाचे जे अधिकार व कामें आहेत ते अधिकार अशा बोर्डास असतील व त्यानें तीं कामें केलीं पाहिजेत; आणि त्यांच्या चेअरमनास १८ व्या कलमांत सांगितलेल्या परवान्यावर सही करतां येईल; आणि अशा शाळेंत अटकवून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांचे ते पालन करणारे आहेत असें समजलें पाहिजे.

बोर्ड आफ् म्यानेजमेंट याचे अधिकार.

२५. स्थानिक सरकारास, शाळेची जी कोणतीही ट्रस्टींची मंडळी किंवा व्यवस्थापक, कलम ९, रकम (ब) हींत उल्लेख केलेल्या कानूंप्रमाणें वागण्यास राजी असतील त्यांला या आक्टाखालील बोर्ड आफ् म्यानेजमेंट म्हणून ठरवितां येईल, आणि मग अशा मंडळीस किंवा व्यवस्थापकांस अशा बोर्ड आफ् म्यानेजमेंटचे सर्व अधिकार असतील व तिनें किंवा त्यांनीं अशा बोर्डाचीं सर्व कामें केलीं पाहिजेत.

शाळेच्या ट्रस्टींस किंवा इतर व्यवस्थापकांस बोर्ड आफ् म्यानेजमेंटमध्यें नेमण्याचा अधिकार.

२६. (१) स्थानिक सरकारची पूर्वीं मंजुरी घेऊन, सन्मार्गप्रवर्तक शाळेचा दरेक बोर्ड आफ् म्यानेजमेंट यास खालील बाबतींविषयीं या आक्टास अनुसरून असणारे कानू वेळोवेळीं करतां येतील, म्हणजे—

बोर्डाचा कानू करण्याचा अधिकार.

(१) जे जिन्नस "मना केलेले जिन्नस" ह्मणून समजावयाचे ते ठरविण्याविषयीं; आणि

(२) खालील बाबतींचें, ह्मणजे—

(अ) बोर्डाचें काम चालविणें;

(ब) शाळेची व्यवस्था;

(क) अल्पवयी अपराध्यांचा विद्याभ्यास व उद्योगसंबंधी शिक्षण;

(ड) अल्पवयी अपराध्यांस भेटणें व त्यांच्याशीं दळणवळण ठेवणें;

(ई) "मना केलेले जिन्नस" ह्मणून बोर्डानें ठरविलेले कोणतेही जिन्नस कोणत्या अटींअन्वयें व शर्तींअन्वयें शाळेंत आणतां येतील तें;

(फ) असे जिन्नस योग्य अधिकारावांचून शाळेंत आणले असतील तेव्हां ते कोणत्या रीतीनें तींतून काढावयाचे तें;

(ग) अशा शाळेंत अटकवून ठेवण्याचा हुकूम ज्याविषयीं झाला असेल अशा कोणत्याही अल्पवयी अपराध्यास तिच्याबाहेर असे जिन्नस कोणत्या शर्तींअन्वयें व इयत्तांअन्वयें देतां येतील तें;

(ह) अशा कोणत्याही अल्पवयी अपराध्यानें असे जिन्नस कबज्यांत ठेवण्याविषयीं कोणत्या शर्तींवर मंजुरी देतां येईल तें;

(आय) असे जिन्नस योग्य अधिकारावांचून देण्यांत किंवा कबज्यांत ठेवण्यांत येतील तेव्हां ते दिल्याबद्दल किंवा कबज्यांत ठेवल्याबद्दल करावयाच्या शिक्षा;

(जे) अल्पवयी अपराध्यांनीं केलेल्या अपराधांबद्दल शिक्षा; आणि

(के) अल्पवयी अपराध्यांस चाकरीस ठेवण्याबद्दल परवाने देणें;

यांचें नियमन करण्याविषयीं.

(२) बोर्ड आफ् म्यानेजमेंट नसेल तेव्हां स्थानिक सरकारास, पोटकलम (१) यांतील रकम (२) (अ) हिच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही रकमेंत सांगितलेल्या गोष्टींचें व तसेंच व्हिजिटरांच्या कमिटीनें आपलें काम कोणत्या रीतीनें चालवावें याचें, कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेकरितां, नियमन करण्याविषयीं या आक्टास अनुसरून असणाऱ्या कानू करतां येतील.

### ४.—सन्मार्गप्रवर्तक शाळांच्या संबंधानें अपराध.

मना केलेले जिन्नस शाळेंत आणण्याबद्दल किंवा तींतून काढण्याबद्दल किंवा देण्याबद्दल शिक्षा.

२७. जो कोणी २६ व्या कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याही कानूविरुद्ध मना केलेला कोणताही जिन्नस, कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेंत आणील किंवा कोणत्याही प्रकारच्या साधनानें आणण्याचा प्रयत्न करील, किंवा कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याचा हुकूम ज्याविषयीं झाला असेल अशा कोणत्याही अल्पवयी अपराध्यास तिच्या हद्दीबाहेर देईल किंवा देण्याचा प्रयत्न करील तो मनुष्य,

आणि सन्मार्गप्रवर्तक शाळा स्वाधीन असणारा जो कोणी अमलदार किंवा मनुष्य, अशा कोणत्याही कानूविरुद्ध, जाणून बुजून, असा कोणताही जिन्नस कोणत्याही सन्मार्गप्रवर्तक शाळेंत आणूं देईल, तींत अटकवून ठेवलेल्या कोणत्याही अल्पवयी अपराध्यास

कब्ज्यांत ठेवूं देईल, किंवा तिच्या हद्दीबाहेर अशा कोणत्याही अल्पवयी अपराध्यास देऊं देईल, तो दरेक अमलदार किंवा मनुष्य,

आणि जो कोणी या कलमाअन्वयें शिक्षा करण्याजोगा कोणताही अपराध करण्यांत साह्य करील तो मनुष्य,

माजिस्ट्रेटापुढें अपराधाची शाबिती झाल्यावर, सहा महिन्यांहून जास्त नसणाऱ्या मुदतीच्या कैदेस, किंवा दोनशें रुपयांहून जास्त नसणाऱ्या दंडास, किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल.

२८. जो कोणी, अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेतून, किंवा अशा अल्पवयी अपराध्यास चाकरीस ठेवणाराकडून पळून जाण्यामध्यें किंवा पळून जाण्याच्या प्रयत्नामध्यें साह्य करील. त्यास पराकाष्ठा सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत कैदेची किंवा पराकाष्ठा शंभर रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा करतां येईल, किंवा या दोन्ही शिक्षा करतां येतील. अल्पवयी अपराध्यांस पळून जाण्यामध्यें साह्य करण्याबद्दल शिक्षा.

२९. या आक्टाअन्वयें सन्मार्गप्रवर्तक शाळेंत पाठविलेला जो कोणताही अल्पवयी अपराधी अशा शाळेंतून किंवा त्यास चाकरीस ठेवणाराकडून पळून गेला असेल, त्यास माजिस्ट्रेटाच्या हुकुमावांचून व वारंटावांचून पोलीस अमलदार धरूं शकेल व अशा शाळेंत किंवा चाकरीस ठेवणाराकडे परत नेऊं शकेल. पळून गेलेल्या अल्पवयी अपराध्यास धरणें.

## ५.—किरकोळ.

३०. सन १८६९ चा कैद्यांच्या साक्षीचा आक्ट याचे ठराव लागू करतां येतील तेथवर ते, सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकवून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांस, ते अपराधी त्या आक्टाच्या अर्थानुसारें, तुरुंगांत अटकेंत ठेवलेले मनुष्य असल्याप्रमाणें लागू केले पाहिजेत. सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकवून ठेवलेल्या अल्पवयी अपराध्यांस सन १८६९ चा १५ वा आक्ट लागू करणें.

३१. या आक्टांत किंवा त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या इतर कोणत्याही कायद्यांत कोणताही मजकूर असला तथापि कोणत्याही कोर्टाला, त्यास योग्य वाटेल तर, कोणत्याही अल्पवयी अपराध्यास काळ्या पाण्यावर पाठविण्याची किंवा कैदेची शिक्षा देण्याच्या बदला किंवा सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकावून ठेवण्याविषयीं फर्माविण्याच्याबदला— अल्पवयी अपराध्यांची इतर रीतीनें कशी व्यवस्था करतां येईल.

(अ) योग्य ताकीद देऊन सोडून देण्याविषयीं, किंवा

(ब) त्याचा बाप किंवा आई किंवा पालन करणारा किंवा अगदी जवळचा जाणता नातलग यानें बारा महिन्यांहून जास्त नसणाऱ्या कोणत्याही मुदतीपर्यंत त्या अल्पवयी अपराध्याच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल जबाबदार असण्यासाठीं, कोर्ट मागेल त्याप्रमाणें, जामिनानिशीं किंवा जामिनावांचून मुचलका लिहून दिल्यावर, असा बाप किंवा आई किंवा पालन करणारा किंवा अगदी जवळचा जाणता नातलग याच्या स्वाधीन करण्याविषयीं,

हुकूम करतां येईल.

३२. सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या ३९७ व्या कलमाच्या शेवटीं खालील पारिग्राफ जास्त दाखल केला पाहिजे: तो येणेंप्रमाणें:— सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या ३९७ व्या कलमाची सुधारणा.

"या कलमाच्या कारणांकरितां, सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवलेला मनुष्य हा, कैदेची शिक्षा भोगत असणारा मनुष्य आहे असें मानलें पाहिजे."

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८८९ साली हिंदुस्थान सरकारच्या नजरेस असें आणिलें होतें कीं अल्पवयी अपराध्यावर ज्या प्रांतांत अपराधाची शाबिती होऊन शिक्षा दिली जाते त्याखेरीज इतर प्रांतांत असणाऱ्या सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अशा अल्पवयी अपराध्यास प्रस्तुत कायद्यावरून अटकवून ठेवतां येत नाहीं. याकरितां, या विषयावर स्थानिक सरकारांचा व आड्मिनिस्ट्रेशनांचा सल्ला घेण्यासाठीं व तसेंच सन्मार्गप्रवर्तक शाळांसंबंधीं कायद्यांत ज्या कोणत्याही जारन सुधारणा करणें इष्ट असल्याचें अनुभवावरून दिसून आलें असेल त्यांबाबद सूचना मागविण्यासाठीं एक पटहुकूम काढण्यांत आला. या लेखास आलेले जबाब, सन १८९२ सालच्या प्रिझन कान्फरन्सनें केलेल्या शिफारसी, ब्रह्मदेशच्या चीफ कमिशनरानें कांहीं विचार सादर केले ते आणि व्हिक्टोरिया वसाहतींतील व स्ट्रेट्स सेटलमेंट्स मधील सन्मार्गप्रवर्तक संस्थांसंबंधी कागदपत्र, यांचा हिंदुस्थान सरकारानें विचार केला, आणि जरी वर सांगितलेली काम चालविण्याच्या संबंधाची अडचण, सन १८७१ चा कैद्यांचा आक्ट सुधारण्याकारितां सन १८९४ चा ७ वा आक्ट ठरवून दूर केली आहे, तरी सन्मार्गप्रवर्तक शाळांचा आक्ट (सन १८७६ चा ९) यांत दुसऱ्या पुष्कळ सुधारणा करणें जरूर आहे असें समजण्यांत आलें आहे. असें असल्याकारणानें, सदहू ९ व्या आक्टांत हल्लीं असणारीं व्यंगें दूर करावीं व हिंदुस्थान सरकारास ज्या सुधारणा योग्य दिसल्या आहेत त्या सर्व त्या आक्टांत सामील कराव्या यासाठीं तो रद्द करून पुनः ठरविण्याचें योजिलें आहे, आणि या हेतूनें हा मसुदा रुजू करण्याकरितां तयार केला आहे.

२. सदरील मसुद्यावरून सन १८७६ च्या आक्टांत ज्या मुख्य सुधारणा करण्याचें योजिलें आहे त्या थोडक्यांत खालीं दाखल केल्या आहेत.

**कलम ४ (अ).**—सदरहू आक्टाच्या ३ ऱ्या कलमांत "अल्पवयी अपराधी" या संज्ञेची "जो कोणताही मुलगा सोळा वर्षांचे आंतील वयाचा असून त्यावर कैदेची किंवा काळे पाण्यावर पाठविण्याची शिक्षा करण्यायोग्य कोणतेही अपराधाची शाबिती झाली असेल तो मुलगा" अशा अर्थाची व्याख्या केली आहे. ही व्याख्या, अपराधाच्या शाबितीच्या वेळीं सोळा वर्षांच्या वयाखालीं असणाऱ्या मुलग्यास लागू करण्याचा इरादा असावा असा संभव दिसतो. तेव्हां ७ व्या कलमांतील "सोळा वर्षांचे आंतील वयाचा असेल" हे शब्द फाजील आहेत हें उघड आहे. या कलमांत दिलेल्या व्याख्येवरून ह्यासंबंधानें कांहीं भानगड राहणार नाहीं.

**कलमें ८ व १०.**—आक्टाचीं कलमें ७ व ८ यांमध्यें, इतर गोष्टींबरोबर, अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंत ज्या मुदतीपर्यंत पाठवावयाचें ती "बाविसावे कलमाअन्वयें (गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं) कोणत्याही कानू केलेल्या असतील त्या कानूंअन्वयें" असावी असें ठरविलें आहे; परंतु अशा प्रकारच्या बाबतींत, नजरेस येईल त्या प्रमाणें करण्याचा जो कोर्टांचा अधिकार त्यास एक्झिक्यूटिव्ह सरकारानें केलेल्या कानूंचा अटकाव असणें योग्य नाहीं असें वाटत असल्यावरून आक्टाचें कलम २२ व कलमें ७ व ८ यांमध्यें त्यावर दिलेला हवाला हीं कायद्यांतून काढून सदरहू विषयावरील हल्लींचे नियम नव्या कायद्यांत सामील करण्याचें योजिलें आहे.

त्याचप्रमाणें, आक्टाच्या ८ व्या कलमांत सांगितलेले अधिकार फक्त जिल्हा व पोटतुकडी माजिस्ट्रेटांनीं आणि त्या बाबतींत स्थानिक सरकारानें मुद्दाम अधिकार दिलेल्या पहिल्या वर्गाच्या माजिस्ट्रेटांनीं चालवावे अशी इयत्ता ठरविण्याच्या हेतूनें त्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफांत कांहीं फेरफार सुचविण्यांत आला आहे. सबब आक्टाचें कलम ८ (२) यांत मसुद्याचें कलम १० (२) यावरून सुधारणा करण्याचें योजिलें आहे.

**कलम ९.**—हें नवीन असून तें, सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याविषयीं स्वतः फर्माविण्याचा अधिकार नसणाऱ्या माजिस्ट्रेटांस, ज्या बाबतींमध्यें असा अटकाव ही वाजवी शिक्षा आहे असें त्याला वाटेल त्या बावती, प्रसंगाप्रमाणें, जिल्हा किंवा पोटतुकडी माजिस्ट्रेटाच्या हुकुमाकरितां सादर करतां याव्या या हेतूनें ठरविलें आहे व तें ताब्यांतील माजिस्ट्रेट पुरती कडक शिक्षा देऊं शकत नसेल त्या प्रसंगीं, सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या ३४९ व्या कलमांत जी काम चालविण्याची रीत सांगितली आहे तिच्या धोरणावर केलें आहे.

**कलम ११.**—हेंही नवीन असून त्यांत, कोर्टानें सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याबद्दल हुकूम करण्यापूर्वीं, संबंध असणाऱ्या अल्पवयी अपराध्याच्या वयाविषयीं चौकशी करून त्याबाबद ठराव लिहून ठेवावा असें स्पष्टपणें फर्माविलें आहे.

**कलम १२.**—असें सुचविण्यांत आलें आहे कीं, सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याची शिक्षा झालेल्या अल्पवयी अपराध्याची तिकडे एकदम सोई होण्यासारखी नसेल, तेव्हां अशा अल्पवयी अपराध्याची शाळेमध्यें सोईकरतां येई तोंपर्यंत तो तुरुंगाच्या जुव्हेनाइल वार्डांत किंवा इतर योग्य भागांत अटकवून ठेविला जाण्यास पात्र असावा व याप्रमाणें तुरुंगांत गेलेली मुदत सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकावामध्यें गेलेल्या मुदतीदाखल गणावी असें ठरवावें. ही शिफारस अमलांत आणण्यासाठीं मसुद्याच्या १२ व्या कलमावरून आक्टाच्या ९ व्या कलमास एक विशेष ठराव जोडण्याचें योजिलें आहे.

**कलम १४**.—स्थानिक सरकार अल्पवयी अपराध्यास सन्मार्गप्रवर्तक शाळेंतून काढूं इच्छीत असेल परंतु त्यास रखवालीखालील अटकावांतून अजीबात सोडूं इच्छीत नसेल, तर आक्टाचें कलम ११ (ब) याअन्वयें त्यानें त्याला "त्या ठरावाचे बाकीचे मुदतीपर्यंत" इतर ठिकाणीं अटकेंत ठेवण्याविषयीं फर्माविलें पाहिजे. लगत वर उतरून घेतलेले शब्द संशयभूत असल्या कारणानें त्यांचा अर्थ बरोबर कळत नाहीं, याकरितां तो सगळा ठराव फिरवून व अवल शिक्षा मुदत भरून ज्या वेळीं संपली असती त्याहून ज्यास्त नसणाऱ्या कोणत्याही मुदतीपर्यंत सन्मार्गप्रवर्तक शाळेखेरीज इतर जागीं अटकेंत ठेवण्याविषयीं अशा बाबतींत स्थानिक सरकारास हुकूम करतां येईल असें स्पष्टपणें ठरवून सर्व संदिग्धता दूर करण्याचें योजिलें आहे

**कलम १५.**—असा विचार झाला आहे कीं, अपील कोर्टाचे अधिकार, कैदेची किंवा काळ्यापाण्यावर पाठविण्याची अवल शिक्षा दिली असेल तिच्या संबंधापुरतेच लागू करावे आणि सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवण्याबद्दलचा हुकूम, ही शिक्षा टिकेल किंवा न टिकेल त्याप्रमाणें कायम किंवा रद्द करावा. सबब अशा प्रकारचा स्पष्ट ठराव या कलमांत योजिला आहे.

चांगल्या वर्तणुकीबद्दल तारण न दिलें असतां जे अल्पवयी मनुष्य सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या १२३ व्या कलमाअन्वयें कैदेंत ठेविले जाण्यास पात्र आहेत, त्यांस सन्मार्गप्रवर्तक शाळांच्या आक्टाचे ठराव लागू करावे हा १६ व्या कलमाचा मतलब आहे. जर असे कोणतेही अवगुणी अल्पवयी मनुष्य असले तर त्यांची व्यवस्था, ज्या अल्पवयी मनुष्यांवर "अपराध" शाबीत झाला असेल त्यांची व्यवस्था करण्यांत येते त्याच रीतीनें करण्याविषयीं अधिकार घ्यावा हें अगदीं वाजवी आहे.

**कलम २३.**—जो व्हिजिटर व्हिजिटरच्या नात्यानें आपलें काम करण्यामध्यें मोठी ढिलाई करील त्यास कामावरून दूर करण्याविषयीं ठराव करणें इष्ट आहे, ह्मणून आक्टाच्या १८ व्या कलमांत एक पोटकलम जास्त दाखल करून, असें ठरविलें आहे कीं, ज्या कोणत्याही व्हिजिटरास ज्या शाळेकरितां नेमलें असेल ती त्यानें एकसारखी सहा महिन्यांपर्यंत जाऊन पाहिली नाहीं किंवा तिच्या व्यवस्थेमध्यें साह्य केलें नाहीं, तर तेवढ्या गोष्टीवरूनच तो शाळा पाहण्याबाबदच्या कमिटीचा सभासद असण्याचा बंद होईल.

**कलमें २६ व २७.**—या कलमांवरून आक्टाचें २१ वें कलम वाढवून, तुरुंगांबाबद आक्ट (सन १८९४ चा ९) याच्या ३ ऱ्या कलमाच्या अर्थाप्रमाणें "तुरुंग" नसणाऱ्या सन्मार्गप्रवर्तक शाळांस, "मना केलेले" ह्मणून ठरविण्यांत येतील तसे जिन्नस आणणें, काढणें व देणें यांचें नियमन करण्याबाबदचे त्या आक्टाच्या ४२ व्या कलमांतील ठराव लागू करण्याचा इरादा आहे.

**कलम ३०.**—कैद्यांच्या साक्षीचा आक्ट (सन १८६९ चा १९) यांतील ठरावांसारखे ठराव, सन्मार्गप्रवर्तक शाळांमध्यें अटकेंत ठेविलेल्या अल्पवयी अपराध्यांच्या संबंधानें उपयोगीं पडण्यासारखे आहेत, ह्मणून एक नवीन कलम दाखल करून, ते ठराव जरूरीच्या फेरफारांनिशीं लागू होतील असें ठरविण्याचें योजिलें आहे.

**कलम ३१.**—हें कलम, सारांशरूपानें, स्ट्रेटस सेटल्मेंट्स यांमधील सन्मार्गप्रवर्तक संस्था व उद्योगशाळा यांसंबंधी कायद्यांतून घेतलेलें आहे. ज्या अल्पवयी अपराध्यावर अपराध शाबीत झाला असेल त्यास नुसती ताकीद देऊन सोडून देण्याविषयीं, किंवा त्याच्या बापानें, आईनें, नातलगानें किंवा पालनकरणारानें कांहीं नियमित मुदतीपर्यंतचा त्या गुन्हेगाराच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल मुचलका लिहून दिल्यावर त्याच्या किंवा तिच्या रखवालींत देण्याविषयीं या कलमांत ठराव केला आहे.

**कलम ३२** —ब्रह्मदेशाच्या चीफकमिशनरानें नजरेस आणलेली अडचण दूर करण्यासाठीं, मसुद्याचें हें कलम अशा उद्देशानें दाखल केलें आहे कीं, सन १८८२ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींचा कायदा याच्या ३९७ व्या कलमांत, एका अपराधाबद्दल अगोदर शिक्षा झालेल्या अपराध्यास पुनः शिक्षा देण्याविषयीं ठराव आहे त्या कलमाच्या कारणाकरितां, सन्मार्गप्रवर्तक शाळेंत अटकवून ठेवलेला मनुष्य कैदेची शिक्षा भोगत असलेला मनुष्य आहे असें मानलें पाहिजे, हें स्पष्ट करावें.

३. आक्टांत ज्या बाकी सुधारणा करण्याचें योजिलें आहे त्यांविषयीं खुलासा करण्याची जरूरी नाहीं असें वाटत आहे.

(सही) जे. वुडबर्न.

तारीख २० माहे मार्च, सन १८९६.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.